# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक, गडचिरोली

दिनांक २४/०४/२०१८

## पोलीस नक्षल चकमकीत ६ नक्षली ठार

> गडचिरोली पोलीस दलाची पुन्हा यशस्वी कामगिरी

गडचिरोली जिल्ह्यातील उपविभाग जिमलगट्टा अतंगर्त मौजा - नैनेर जगंल परीसरात गडचिरोली पोलीस दलातील सी - ६० पथकाचे जवान नक्षल विरोधी अभियान् राबवीत असतांना दिनांक २३/०४/२०१८ रोजी सांयकाळी ०४.३० वा ते ०५.०० वा चे सुमारास जंगलात दबा धरुन बसलेल्या माओवादयांनी पोलीसांवर अंदाधुंद गोळीबार केला असता पोलीसांनी प्रत्युत्तरादाखल व स्वसंरक्षणार्थ माओवादयांच्या दिशेने गोळीबार केला. तब्बल ३० मिनिटांनंतर गोळीबार थांबला

यानंतर सदर परिसरात शोधमोहिम राबविली असता आतापर्यंत मिळालेल्या माहीती नुसार ०६ माओवादयांचे मृतदेह व मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा मिळला. त्यात एक एसएलआर, एक इंन्सास, एक ३०३ रायफल, एक मस्केट रायफल, दोन बारा बोअर रायफल तसेच मोठ्या प्रमाणात पिट्टु, नक्षल साहीत्य मिळाले आहे. सदरच्या जंगल परिसरात अद्यापही शोध मोहिम राबविण्यात येत आहे. मृतांमध्ये डिव्हीसी रॅकचा एक नक्षलवादी नंदु सह ०४ महिला व एक पुरुष नक्षलवाद्यांच्या समावेश आहे. तसेच मृतदेहांमध्ये कार्तिक उईके याची ओळख पटली आहे.

महाराष्ट्र व छत्तीसगड सीमेवरील उपविभाग भामरागड अंतर्गत कसनासुर येथे दिनांक २२ एप्रिल रोजी झालेल्या चकमकी नंतर पुन्हा एकदा गडचिरोली पोलीसांचे हे मोठे यश मानले जात आहे. यानंतर सदर भागात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.